प्रधानमंत्री आवास योजना (नागरी) अंतर्गत खाजगी विकासकांच्या PPP/Joint Venture अंतर्गत जाहिरातीबाबत

महाराष्ट्र शासन
गृहनिर्माण विभाग
**शासन परिपत्रक क्रमांकः प्रआयो-२०१९/प्र.क्र.२१/गृनिधो-२**
मंत्रालय, मुंबई-३२.
दिनांकः- ०८ फेब्रुवारी, २०१९.

<u>प्रस्तावना</u> :-

प्रधानमंत्री आवास योजनेस गती देण्याच्या दृष्टीकोनातून राज्य शासनाने PPP, Joint Venture तसेच महाकामगार आवास योजना सारख्या योजना राबविण्याचा निर्णय शासनाने घेतलेला आहे. त्याचबरोबर महाराष्ट्र गृहनिर्माण विकास महामंडळ ( महाहौसिंग) स्थापन करण्यात आलेले आहे. सदर योजनेअंतर्गत सन २०२२ अखेर १९.४० लक्ष इतका राज्यास असलेला लक्षांक पूर्ण करण्याच्या दृष्टीने योजनेच्या अंमलबजावणीमध्ये येत असलेल्या विविध अडचणी दूर करण्याच्या अनुषंगाने खाजगी विकासकांच्या PPP/Joint Venture अंतर्गत खाजगी विकासकाकडून जाहिरात करुन लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

<u>शासन परिपत्रक</u> :-

प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत खाजगी विकासकांच्या सार्वजनिक-खाजगी भागीदारी ( PPP) व संयुक्त भागीदारी प्रकल्प ( Joint Venture) अंतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांची खाजगी विकासकाकडून जाहिरात करुन लाभार्थ्यांकडून अर्ज मागविण्यास व प्रथम येणा-यास प्रथम प्राधान्य या धर्तीवर प्रधानमंत्री आवास योजनेच्या मार्गदर्शक सूचनांनुसार घरांचे वाटप करण्यास परवानगी देण्यात येत आहे. या अनुषंगाने प्रकल्पांची जाहीरात करण्यापूर्वी आपल्या प्रकल्पांची नोंदणी महारेराकडे करणे विकासकास बंधनकारक राहील.

(दुर्गाप्रसाद मैलावरम)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मा.मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई-३२.
२) मा.मंत्री (गृहनिर्माण) यांचे स्वीय सहायक, मंत्रालय, मुंबई-३२.

सी/श्री वाघमारे/letter